रविवार दि. २० सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक २० वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## दुष्काळ जाहीर करा; शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या, चारा छावण्या व रोजगार हमीची कामे सुरू करा : खासदार डॉ. कल्याण काळे

### पीक परिस्थिती आढावा बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधले; पीकविम्यासाठी पूर्वीची पोर्टल प्रणाली सुरू करण्याची मागणी

**जालना – प्रतिनिधी**

: जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांसह छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील खरीप पीक परिस्थिती गंभीर बनली असून, पावसाच्या दीर्घ खंडामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर आज नांदेड येथील नियोजन भवनात मा. कृषिमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या पीक परिस्थिती आढावा बैठकीस जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून सहभागी होत शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले. जालना जिल्ह्याचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान ६०३ मि.मी. असून चालू वर्षी आतापर्यंत सुमारे ४०५ मि.मी. पर्जन्यमान झाले आहे. जिल्ह्यात खरीप पिकांचे सर्वसाधारण क्षेत्र ६.१९ लाख हेक्टर असताना चालू वर्षी खरीप क्षेत्र ५.८६ लाख हेक्टर आहे. दुसरीकडे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ६३६.९९ मि.मी. असून चालू वर्षी सुमारे ४२२ मि.मी. पर्जन्यमान झाले आहे. या जिल्ह्यात सरासरी खरीप क्षेत्र ६.८४ लाख हेक्टर असून चालू वर्षी खरीप क्षेत्र ६.३७ लाख हेक्टर आहे. जालना जिल्हा प्रशासनाच्या प्राथमिक अहवालानुसार यंदाच्या खरीप हंगामात पर्जन्यमानातील अनिश्चितता तसेच पावसाच्या खंडाचा पिकांच्या परिस्थितीवर परिणाम झाला आहे. १४ सप्टेंबरअखेर जूनपासून झालेला पाऊस या कालावधीतील सरासरीच्या ८१% इतका झाला असून सप्टेंबर महिन्यातील पर्जन्यमान सरासरीच्या केवळ ३३.१% इतके नोंदविण्यात आले आहे.



**दुष्काळ जाहीर करून तातडीने मदत द्यावी**

या परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पात्र भागात तातडीने दुष्काळ जाहीर करून दुष्काळी उपाययोजना लागू कराव्यात, अशी ठाम मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बैठकीत केली.

केवळ पर्जन्यमानाची सरासरी पाहून परिस्थितीचे मूल्यमापन न करता पावसातील खंड, पिकांची सद्यस्थिती, जमिनीतील ओलावा आणि प्रत्यक्ष उत्पादनातील संभाव्य घट यांचा एकत्रित विचार करून निर्णय घेण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

**चारा छावण्या सुरू करा**

पावसाअभावी खरीप पिकांसोबतच पशुधनासाठी चारा व पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ज्या भागात चारा व पाण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, त्या ठिकाणी तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी डॉ. काळे यांनी केली.

मराठवाड्यातील पावसाच्या तुटीमुळे खरीप पिकांची स्थिती चिंताजनक असल्याचे अलीकडील अहवालांमध्ये नमूद करण्यात आले असून काही भागांत पाणी व चारा उपलब्धतेचा प्रश्नही गंभीर होत असल्याचे वृत्त आहे.

**यावर्षीचे पीक कर्ज माफ करा**

पीक हातातून गेल्यानंतर शेतकऱ्यांसमोर कर्जफेडीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांनी पेरणी, बियाणे, खते, औषधे व मशागतीसाठी केलेला खर्चही वसूल होण्याची शक्यता कमी झाली आहे. त्यामुळे चालू वर्षी शेतकऱ्यांनी घेतलेले पीक कर्ज माफ करावे, अशी स्पष्ट मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली. तसेच, यापूर्वीच्या कर्जमाफीच्या प्रक्रियेत विविध कारणांमुळे कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांनाही यावेळी कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

**पीकविम्यासाठी पूर्वीची पोर्टल प्रणाली पुन्हा सुरू करा**

पीकविमा योजनेत शेतकऱ्यांना नुकसान नोंदणी व विमा दावा दाखल करताना येणाऱ्या अडचणींचा विचार करून पीकविम्यासाठी पूर्वीची सुलभ पोर्टल प्रणाली पुन्हा सुरू करावी, अशी मागणी डॉ. काळे यांनी केली.

तसेच पीकविमा नुकसानभरपाई निश्चित करताना केवळ वर अवलंबून राहू नये, असे त्यांनी स्पष्ट केले. पावसातील खंड, महसूल मंडळनिहाय पिकांची प्रत्यक्ष स्थिती, शेतातील पीक नुकसान, जमिनीतील ओलावा आणि उत्पादनातील घट या सर्व बाबींचा एकत्रित विचार करून नुकसान निश्चित करावे. प्रत्यक्ष शेतकऱ्याचे नुकसान लक्षात न घेता *(पान २ वर)*

## गणेश महासंघातर्फे गौसन्मानार्थ आज जालन्यात जनजागृती रॅली

### गौप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे- श्लोक अग्रवाल

**जालना – प्रतिनिधी**

संपूर्ण देशभरात गोहत्या पूर्णतः प्रतिबंधित करून गोमातेला पूर्ण संरक्षण मिळावे, गोमातेला राष्ट्रमाता, राष्ट्र आराध्या, या सन्मानित पदाचा दर्जा प्राप्त व्हावा तसेच संपूर्ण भारतवर्षात समान गोसेवा घडण्यासाठी स्वतंत्र केंद्रीय गोसेवा मंत्रालय स्थापन करून केंद्रीय कायदा लागू करण्यात यावा, या मागण्यांसाठी श्री गणेश महासंघ, अद्विक क्लब, रोटरी क्लब ऑफ जालना इलाईट आणि इनरव्हील क्लब ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ६:३० वाजता भव्य 'गौसन्मान अभियान जनजागृती रॅली'चे आयोजन करण्यात आले आहे, अशी




माहिती श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष श्लोक जगदीश अग्रवाल व महासचिव भूषण पारसनंद यादव यांनी दिली.

ही जनजागृती रॅली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जवाहर बागपर्यंत काढण्यात येणार आहे. रॅलीचा शुभारंभ प्रमुख मार्गदर्शक व युवा नेते अक्षय गोरंट्याल यांच्या हस्ते होणार असून, यावेळी बाबा नंद, महासंघाचे माजी अध्यक्ष रोहित भुरेवाल, महापालिकेतील विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक दुर्गेश कटोटीवाले, नगरसेवक दिनेश भगत आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या अभियानांतर्गत जनजागृती रॅलीदरम्यान गणेशोत्सवाच्या काळात गणेश मंडळांना स्वाक्षरी मोहिमेसाठी विशेष फॉर्म उपलब्ध करून दिले जाणार आहेत. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातही श्री गणेश महासंघातर्फे नागरिकांसाठी स्वाक्षरी स्टॉल उभारण्यात येणार आहे. *(पान २ वर)*

## गणेशोत्सवातील शिस्त आणि शांतता विसर्जन मिरवणुकीपर्यंत कायम ठेवावी–तेगबीरसिंह संधू

**जालना – प्रतिनिधी**

जालना शहरात सुरू असलेल्या गणेशोत्सवादरम्यान पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी शुक्रवार दि. १८ सप्टेंबर रोजी रात्री ८.३० वाजता श्री गणेश महासंघाला सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी त्यांच्याहस्ते जालन्यातील पहिली सार्वजनिक आरती झाली. याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी गणेश मंडळांच्या शिस्तबद्धतेचे कौतुक केले असून, उत्सवाची हीच शांतता आणि शिस्त विसर्जन मिरवणुकीपर्यंत कायम ठेवण्याचे आवाहन केले.



श्री. संधू पुढे म्हणाले की , जालना शहरात गणेशोत्सवाची सुरुवात पारंपरिक आणि शिस्तबद्ध पद्धतीने झाली आहे. मामा चौकातून निघणारी विसर्जन मिरवणूक आणि संपूर्ण उत्सव पारंपरिक व शिस्तबद्ध मार्गाने पार पडून जालना शहर संपूर्ण राज्यासमोर एक आदर्श घालून देईल, असा विश्वास तेगबीर सिंह संधू यांनी व्यक्त केला. यावेळी श्री. संधू यांच्यासमवेत अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, सहाय्यक पोलीस निरीक्षक सपकाळ, स्थानिक गुन्हे शाखेचे श्री. सोनवणे यांची उपस्थिती होती. प्रारंभी श्री महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल, महासचिव भूषण पारसनंद यादव यांनी शाल व श्रीफळाद्वारे त्यांचे स्वागत केले. महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल म्हणाले की, गणेशोत्सव शांतता, शिस्त आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक बनविण्यासाठी सर्व गणेश मंडळांनी एकत्रितपणे सहकार्य करावे, हीच महासंघाची भूमिका आहे. *(पान २ वर)*

### उत्कृष्ट मंडळांसाठी आयजी शील्ड, स्वॉर्ड पुनरुज्जीवित करण्याचे संकेत

श्री गणेश महासंघाच्यावतीने श्री विसर्जन मिरवणुकीचा शुभारंभ मामा चौकात करण्यात येऊन सर्व गणेश मंडळाच्या अध्यक्षांचा सत्कार करण्यात येतो. यापूर्वी उत्कृष्ट, शिस्तप्रिय व पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळांना विशेष 'आयजी शील्ड' देण्याची परंपरा होती, हे निदर्शनास आणून दिले असता, या परंपरेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी विशेष पोलीस महानिरीक्षकांशी चर्चा करून योग्य निकषांच्या आधारे पुन्हा असा सन्मान सुरू करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू म्हणाले. जालन्यातील गणेशोत्सवाची भव्य परंपरा पाहता, सर्व नागरिक व गणेश मंडळांनी एकत्र येऊन सलोखा, शांतता आणि कायदा-सुव्यवस्थेचे पालन करत हा पावन सण साजरा करावा. जालना शहरात माझी ही पहिलीच गणेश आरती असून, येथील गणेश मंडळांचा उत्साह व शिस्त वाखाणण्याजोगी आहे, असे ते म्हणाले.

## तात्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरघोस मदत द्यावी

### *आमदार अर्जुनराव खोतकर यांची कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे मागणी*

**जालना - प्रतिनिधी**

मराठवाड्यात निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरघोस मदत करावी, अशी मागणी शिवसेना उपनेते तथा *आमदार अर्जुनराव खोतकर यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय मामा भरणे यांच्याकडे केली.



मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी कृषिमंत्री दत्तात्रय मामा भरणे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि. १९ सप्टेंबर) ऑनलाईन बैठक घेण्यात आली. या बैठकीस विभागातील पालकमंत्री, खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी तसेच कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत पीक परिस्थिती, पाणीटंचाई, चारा टंचाई तसेच आवश्यक उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीत आमदार अर्जुनराव खोतकर* यांनी जालना मतदारसंघासह जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची सविस्तर माहिती प्रत्यक्ष शेतकऱ्यांना सोबत घेऊन शेतातुन पिकात उभे राहून सहभाग घेतला व नुकसान ग्रस्त पिकांची परिस्थिती, नुकसानीची पाहणी कृषिमंत्र्यांसमोर मांडली. सप्टेंबरअखेर अपेक्षित १६५.९ मि.मी. पावसाच्या तुलनेत प्रत्यक्षात *(पान २ वर)*

## यमुना रेसिडेन्सीमध्ये स्कुटीवर साकारला अनोखा शिवरायांचा देखावा

**जालना – प्रतिनिधी**

येथील यमुना रेसिडेन्सी येथे करण तळेकर यांनी स्कुटीवर बसून आकर्षक आणि संदेशप्रधान देखावा सादर करण्याचा अभिनव प्रयत्न केला. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, भगवी संस्कृती आणि स्त्री-सन्मानाचा संदेश या देखाव्यातून प्रभावीपणे मांडण्यात आला. सजवलेल्या स्कुटीवर पारंपरिक वेशभूषेतील पात्रे तसेच




"स्त्रीचा सन्मान करा, शिवरायांचा विचार पुढे नेऊया!" असा संदेश देणारा फलक ठेवण्यात *(पान २ वर)*

## कौटुंबिक वादाचा थरारक शेवट; लक्कडकोटमध्ये पत्नीची हत्या

### पत्नीच्या हत्येनंतर पती स्वतः सदर बाजार पोलीस ठाण्यात हजर; घटनास्थळी फॉरेन्सिक पथकाकडून पुरावे संकलित

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील लक्कडकोट परिसरात शनिवारी रात्री कौटुंबिक वादातून महिलेची हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, मृत महिलेचे नाव आफरीन नईमोद्दीन काझी (वय ३२) असे आहे. प्राथमिक माहितीनुसार, आफरीन आणि त्यांचे पती नईमोद्दीन काझी यांच्यात गेल्या काही दिवसांपासून कौटुंबिक कारणावरून वाद सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. शनिवारी सायंकाळी या वादाचे पर्यवसान गंभीर हल्ल्यात झाले आणि त्यात आफरीन यांचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास घडल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेनंतर आरोपी पती नईमोद्दीन काझी स्वतः सदर बाजार पोलीस ठाण्यात हजर झाल्याची माहिती असून, पोलिसांनी त्याला ताब्यात घेत पुढील तपास सुरू *(पान २ वर)*

## एकनाथ शिंदेंना संपवण्याची भाषा खपवून घेणार नाही : धनंजय पोहेकर

### मराठा आरक्षणासाठी शिंदे सरकारने घेतलेल्या निर्णयांची यादीच पत्रकार परिषदेत मांडली; जालन्यातील मराठा समाज शिंदेंच्या पाठीशी असल्याचा दावा

**जालना । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत मनोज जरांगे पाटील यांनी केलेली 'संपवण्याची' भाषा शोभणारी नाही. अशा वक्तव्यांचा यापुढे निषेधच नव्हे तर तीव्र विरोध केला जाईल," असा इशारा शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख धनंजय पोहेकर यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिला. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांच्या सरकारने घेतलेल्या निर्णयांचा दाखला देत, शिंदे यांनी मराठा समाजासाठी काय केले याची माहिती समाजासमोर ठेवणे आवश्यक असल्याचेही पोहेकर म्हणाले.




या पत्रकार परिषदेला डॉ. संजय लाखे पाटील, जगन्नाथ शिंदे आणि विनोद शिरसाठ उपस्थित होते.

पोहेकर म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या आंदोलनादरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत आक्षेपार्ह भाषा वापरल्याचा आमचा आरोप आहे. बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे उपोषण स्थगित करताना करण्यात आलेल्या वक्तव्यांवर त्यांनी आक्षेप घेतला. तसेच कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांच्याबाबतही आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात आल्याचा आरोप करत पोहेकर यांनी त्याचाही निषेध केला. "राजकारणात मतभेद असू शकतात. आरक्षणाच्या मागणीवरून सरकारवर टीका करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. मात्र व्यक्तीविषयीची भाषा मर्यादित असली पाहिजे," अशी भूमिका पोहेकर यांनी मांडली.

**शिंदे सरकारच्या निर्णयांची यादी मांडली**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतलेल्या निर्णयांचा संदर्भ देताना पोहेकर यांनी विविध प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रियांचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, न्या. संदीप शिंदे समितीची स्थापना करून मराठा, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा संदर्भातील जुन्या अभिलेखांतील नोंदी शोधण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. पुढे समितीची कार्यकक्षा संपूर्ण महाराष्ट्रासाठी करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या दस्तऐवजातही समितीची कार्यकक्षा संपूर्ण राज्यासाठी करण्यात आल्याचे तसेच जुन्या अभिलेखांमधील कुणबी नोंदींचा शोध, त्यांचे स्कॅनिंग आणि वंशावळ पडताळणीसंदर्भातील कार्यवाहीचा उल्लेख आहे. पोहेकर यांच्या मते, पात्र व्यक्तींना जुन्या नोंदींच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग उपलब्ध *(पान २ वर)*

# संपादकीय...

## वीज जातेय की उत्तरदायित्वही अंधारात जातेय?

गणेशोत्सव म्हणजे प्रकाशाचा, उत्साहाचा आणि सामूहिक आनंदाचा सण. मात्र टेंभुर्णीमध्ये याच उत्सवाच्या काळात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असेल, नागरिकांना रात्रीच्या वेळी अंधाराचा सामना करावा लागत असेल आणि तक्रार केल्यानंतरही तत्पर प्रतिसाद मिळत नसेल, तर प्रश्न केवळ 'वीज कधी येणार?' एवढाच राहत नाही. त्यापुढचा अधिक गंभीर प्रश्न असतोनागरिकांच्या तक्रारी ऐकणार कोण आणि त्यासाठी जबाबदार कोण? वीजपुरवठ्यात तांत्रिक बिघाड होऊ शकतो. ट्रान्सफॉर्मर जळू शकतो, वाहिनीमध्ये बिघाड होऊ शकतो, अतिभारामुळे यंत्रणा बंद पडू शकते. हे तांत्रिक वास्तव आहे. पण एखाद्या गावात वारंवार त्याच स्वरूपाची समस्या निर्माण होत असेल, तर प्रत्येक वेळी केवळ तात्पुरती दुरुस्ती करून प्रश्न संपला असे समजणे म्हणजे मूळ आजारावर उपचार न करता ताप कमी करण्यासारखे आहे. टेंभुर्णीला वीज जातेय की व्यवस्थेचे उत्तरदायित्वच अंधारात जातेय, हा प्रश्न आता महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्याच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर आरोप केले आहेत. अधिकारी मुख्यालयी राहतात की अन्यत्रून ये-जा करतात, नागरिकांच्या तक्रारींना कसा प्रतिसाद दिला जातो, रात्रीच्या आपत्कालीन परिस्थितीत कर्मचारी उपलब्ध असतात का, या सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. आरोप खरे आहेत की नाहीत, हे तपासण्याचे काम वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आहे; परंतु तक्रार करणाऱ्या नागरिकांनाच दोषी ठरवणे हा त्यावरचा उपाय नाही. याहून महत्त्वाचे म्हणजे, चौकशी ही केवळ एखाद्या व्यक्तीपुरती मर्यादित राहता कामा नये. टेंभुर्णीतील वीजपुरवठा वारंवार खंडित होण्यामागे तांत्रिक कारणे कोणती आहेत? ट्रान्सफॉर्मरची क्षमता पुरेशी आहे का? वाहिन्यांची स्थिती काय आहे? देखभाल वेळेवर होते का? बिघाड दुरुस्त करण्यासाठी लागणारा कालावधी किती आहे? तक्रारींची नोंद आणि त्यावरील कार्यवाहीची प्रणाली काय आहे? या प्रश्नांची उत्तरे कागदावर नव्हे, प्रत्यक्ष पाहणीतून मिळायला हवीत. ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्याच्या निलंबनाची मागणी केली आहे. ही मागणी त्यांच्या नाराजीची तीव्रता दाखवते. मात्र प्रशासनाने व्यक्तीला लक्ष्य करण्यापेक्षा प्रथम वस्तुनिष्ठ चौकशी करणे आवश्यक आहे. दोष सिद्ध झाल्यास शिस्तभंगाची कारवाई व्हावी आणि दोष नसेल तर वस्तुस्थितीही नागरिकांसमोर स्पष्ट केली जावी.

कारण नागरिकांचा रोष दाबणे हे प्रशासनाचे काम नाही; त्या रोषामागचे कारण शोधणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. या संपूर्ण प्रकरणातील दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गावातील स्थानिक नेतृत्व. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार गावात अनेक समस्या आहेत आणि राजकीय नेतृत्व त्याकडे पुरेसे लक्ष देत नाही. हा आरोपही तपासण्याची गरज आहे. लोकप्रतिनिधी असो, राजकीय पदाधिकारी असो किंवा सामाजिक कार्यकर्तासणाच्या काळात गाव अंधारात असेल तर केवळ सोशल मीडियावर शुभेच्छांचे संदेश देऊन लोकसेवा पूर्ण होत नाही. नागरिकांच्या अडचणीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांच्या दारात उभे राहणे, समस्या वरिष्ठांपर्यंत पोहोचवणे आणि त्याचा पाठपुरावा करणे, हीच खरी लोकप्रतिनिधित्वाची कसोटी आहे. गावातील राजकारण पक्षीय असू शकते; मात्र गावातील वीज, पाणी, रस्ते आणि आरोग्याच्या समस्या पक्षीय नसतात. त्यामुळे टेंभुर्णीतील सर्व राजकीय व सामाजिक नेतृत्वाने एकत्र येऊन महावितरणसमोर वस्तुस्थिती मांडणे गरजेचे आहे. वीज गेली आणि काही तासांनी आली, एवढ्याने प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. वीज का गेली? पुन्हा का जाते? त्याच ठिकाणी वारंवार बिघाड का होतो? कायमस्वरूपी उपाय का होत नाही? हे प्रश्न विचारणे म्हणजे प्रशासनविरोधी भूमिका नव्हे; ती नागरिकांच्या हक्काची मागणी आहे. महावितरणने टेंभुर्णीतील मागील काही दिवसांतील वीजखंडिततेचा तांत्रिक अहवाल तयार करावा. किती वेळा वीज गेली, किती वेळात पुरवठा सुरू झाला, कोणते बिघाड झाले आणि त्यावर कोणती कार्यवाही झाली, याची माहिती उपलब्ध करून दिल्यास चर्चेला तथ्यांचा आधार मिळेल. आकडेवारी पारदर्शक झाली की आरोप आणि प्रत्यारोपांपेक्षा सत्य अधिक स्पष्ट दिसते. गणेशोत्सवाच्या काळात रात्री मोठ्या प्रमाणावर नागरिक घराबाहेर असतात. गणेश मंडळांचे कार्यक्रम, महिला-मुलांची वर्दळ, ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती आणि गावातील वाढलेली हालचाल लक्षात घेता वीजपुरवठा खंडित होणे ही केवळ गैरसोय नाही. अंधारामुळे सुरक्षिततेचे प्रश्नही निर्माण होऊ शकतात. म्हणूनच सणासुदीच्या काळात महावितरणने विशेष आपत्कालीन पथक, तातडीचा संपर्क क्रमांक, अतिरिक्त कर्मचारी आणि बिघाडाच्या ठिकाणी जलद प्रतिसादाचे नियोजन करणे अपेक्षित आहे. टेंभुर्णीचा प्रश्न एका गावाचा असला तरी त्यातून ग्रामीण भागातील वीज व्यवस्थेच्या उत्तरदायित्वाचा मोठा प्रश्न समोर येतो. महावितरणने टेंभुर्णीला भेट द्यावी. ग्रामस्थांचे म्हणणे ऐकावे. तांत्रिक पाहणी करावी. संबंधित अधिकाऱ्याच्या कार्यपद्धतीची चौकशी करावी. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजेकायमस्वरूपी उपाययोजनेचा कालबद्ध आराखडा जाहीर करावा. कारण नागरिकांना अंधाराची सवय लावणे हे प्रशासनाचे काम नाही. प्रकाश देणारी वीजयंत्रणा आणि उत्तर देणारी प्रशासनव्यवस्थादोन्ही नागरिकांचा अधिकार आहेत. टेंभुर्णी आज हा प्रश्न विचारत आहे. उद्या हा प्रश्न दुसऱ्या गावाचा असू नये, एवढीच अपेक्षा!

# पिंपळवाडीमहालब्दा रस्त्याची सहा महिन्यांतच चाळणी ; १.६२ कोटींचा रस्ता फुटला

## 'एम. एस. आर. एल. कन्स्ट्रक्शन'वर कारवाईची ग्रामस्थांची मागणी

**सोयगाव - प्रतिनिधी**

तालुक्यातील सहा महिन्यापूर्वी करण्यात आलेल्या पिंपळवाडीमहालब्दा रस्त्याची अवघ्या सहा महिन्यांतच चाळणी झाल्याचा प्रकार समोर आला आहे. तब्बल १ कोटी ६२ लाख ४ हजार रुपयांच्या अंदाजित खर्चातून तयार करण्यात आलेल्या या रस्त्याला ठिकठिकाणी तडे जाऊन रस्ता फुटायला सुरुवात झाली आहे. यास जबाबदार असलेल्या एम. एस. आर. एल. कन्स्ट्रक्शन'वर कारवाई करण्याची मागणी होत आहे. या रस्त्याच्या कामाची पाच वर्षे देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी असून त्यासाठी स्वतंत्रपणे ६ लाख ९१ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तरीही रस्ता खराब होत असताना संबंधित कंत्राटदार 'एम. एस. आर. एल. कन्स्ट्रक्शन' यांच्याकडून रस्त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. 'एकदा रस्ता बनला की त्याकडे पुन्हा कोणी पाहत नाही', अशीच परिस्थिती सोयगाव तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांबाबत निर्माण होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

रस्ता तयार झाल्यानंतर त्याची नियमित पाहणी, देखभाल आणि दुरुस्ती केली जाते की नाही, यावरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पिंपळवाडीमहालब्दा हा रस्ता परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, रस्त्याचे काम पूर्ण होऊन अवघ्या सहा महिन्यांतच खराब होऊ लागल्याने कामाच्या गुणवत्तेची तपासणी करण्याची मागणी होत आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून तयार केलेला रस्ता अल्पावधीत खराब होत असेल, तर संबंधित विभागाने याची गंभीर दखल घेणे गरजेचे असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

रस्ता तयार करून केवळ उद्घाटन किंवा फलक लावणे नव्हे, तर त्याची देखभालही तितकीच महत्त्वाची आहे.

त्यामुळे प्रशासनाने पिंपळवाडीमहालबडा रस्त्याची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करून घ्यावी,तसेच कामास जबाबदार असलेल्या एम. एस. आर. एल. कन्स्ट्रक्शन'वर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

पान १ व ४ वरुन...

### दुष्काळ जाहीर करा...

केवळ कागदोपत्री किंवा मर्यादित पीक कापणी प्रयोगांच्या आधारे विमा नुकसानभरपाई निश्चित करणे अन्यायकारक ठरू शकते, असेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ३० महसूल मंडळांत २१ दिवसांपेक्षा अधिक पावसाचा खंड नोंदविल्याचे अलीकडील वृत्त आहे.

पावसाची कमतरता कायम राहिल्यास ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, तसेच संभाव्य टंचाईग्रस्त गावांमध्ये तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, अशी मागणी खासदार डॉ. काळे यांनी केली.

जालना जिल्ह्यात पावसाच्या खंडामुळे जलसाठे व विहिरींच्या पाणीपातळीवर परिणाम होत असून टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची गरज वाढल्याचे अलीकडील वृत्त आहे.

पीक नुकसानामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम झाला असून ग्रामीण भागातील शेतमजुरांसमोरही रोजगाराचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत तातडीने मोठ्या प्रमाणावर कामे सुरू करून शेतकरी व शेतमजुरांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी डॉ. काळे यांनी केली.

''बैठका, पंचनामे आणि अहवाल यापुरते हे संकट मर्यादित ठेवता कामा नये. शेतकऱ्याच्या हातात प्रत्यक्ष मदत पोहोचणे महत्त्वाचे आहे. त्याचे पीक गेले, उत्पादन गेले आणि उत्पन्नाचा स्रोत गेला आहे. अशा परिस्थितीत त्याला पुन्हा कर्जाच्या ओझ्याखाली ढकलण्याऐवजी शासनाने त्याच्या पाठीशी ठोसपणे उभे राहण्याची आवश्यकता आहे,'' अशी भूमिका खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बैठकीत मांडली.

तसेच महसूल व कृषी विभागाने महसूल मंडळनिहाय प्रत्यक्ष पीक पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, पीकविमा कंपन्यांना तातडीने आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय मदत व पीकविम्याचा लाभ वेळेत मिळेल, यासाठी कालबद्ध कार्यवाही करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांतील सद्य पीक परिस्थिती ही केवळ शेतीपुरती मर्यादित नसून शेतकरी कुटुंबांचे अर्थकारण, पशुधन, ग्रामीण रोजगार आणि पिण्याच्या पाण्याशी निगडित व्यापक संकट असल्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी निदर्शनास आणून दिले. दुष्काळ जाहीर करणे, चारा छावण्या सुरू करणे, पीक कर्जमाफी, यापूर्वी वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ, पीकविम्यासाठी पूर्वीची पोर्टल प्रणाली सुरू करणे, पुरते नुकसान मूल्यांकन मर्यादित न ठेवणे, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करणे आणि रोजगार हमीची कामे तातडीने सुरू करणे, या मागण्यांवर शासनाने सकारात्मक व तातडीने निर्णय घ्यावा, अशी ठाम भूमिका खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बैठकीत मांडली.

### गणेश महासंघातर्फे...

गणेशोत्सवादरम्यान तब्बल १ लाख नागरिकांच्या स्वाक्षऱ्या संकलित करून ते निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सुपूर्द करण्यात येणार आहे.

या पवित्र कार्यात व जनजागृती रॅलीत जालन्यातील तमाम गौप्रेमी, भाविक व नागरिकांनी हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल, महासचिव भूषण यादव, कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत, उपाध्यक्ष डॉ. शिवदत्त विजयसेनानी, आनंद बंब, गौरव बोरा, माजी अध्यक्ष रोहित भुरेवाल, मार्गदर्शक बाबा नंद, युवा उद्योजक अर्जुन पित्ती, अमोल बांगड, अद्विक क्लबचे अध्यक्ष राहुल अग्रवाल, रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटच्या अध्यक्षा अनया अग्रवाल, इनरव्हील क्लब ऑफ जालनाच्या अध्यक्षा छाया अग्रवाल यांच्यासह महासंघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

### कौटुंबिक वादाचा...

केला आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद कुलकर्णी, सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती, डीबी पथक प्रमुख सचिन सानप यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा सुरू केला असून, घटनेशी संबंधित पुरावे संकलित करण्यासाठी फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले आहे. घटनास्थळावरून पोलिसांकडून विविध बाबींची तपासणी केली जात असून, हत्येपूर्वी नेमके काय घडले याचा घटनाक्रम जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, पती–पत्नीमध्ये कौटुंबिक कारणावरून वाद असल्याचे सांगितले जात असले तरी हत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. वाद नेमका कशावरून झाला, त्याचे स्वरूप काय होते, हल्ला कशा पद्धतीने झाला आणि घटनेमागे अन्य कोणते कारण आहे का, याचा तपास सदर बाजार पोलीस करीत आहेत. पोलिस तपासात घटनास्थळावरील पुरावे, प्रत्यक्षदर्शींची माहिती आणि संबंधित व्यक्तींचे जबाब यावरून घटनेचा संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

मृत आफरीन यांच्या पश्चात दोन मुले आणि एक मुलगी असल्याची माहिती आहे. दोन्ही मुले लहान असून, त्यांच्या मुलीचे अवघ्या पंधरा दिवसांपूर्वीच लग्न झाले होते. त्यामुळे कुटुंबावर अचानक दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कौटुंबिक वादातून महिलेचा मृत्यू झाल्याची माहिती परिसरात पसरताच नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. घटनेमुळे लक्कडकोट परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. घटनेनंतर पोलिसांनी आरोपी पतीला ताब्यात घेतले असून, हत्येमागील कारण, हल्ल्याचा घटनाक्रम आणि संबंधित सर्व बाबींचा तपास सुरू आहे. पोलिस तपास पूर्ण झाल्यानंतरच हत्येचे नेमके कारण आणि घटनेची संपूर्ण पार्श्वभूमी स्पष्ट होणार आहे. कौटुंबिक वादाचा शेवट अशा प्रकारे जीवघेण्या घटनेत झाल्याने परिसरात चिंता व्यक्त होत असून, या प्रकरणातील पुढील तपासाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### गणेशोत्सवातील...

पोलीस प्रशासनाने केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी असून, यंदाचा गणेशोत्सव आणि विसर्जन मिरवणूक शांततेत, शिस्तीत व उत्साहात पार पाडण्यासाठी महासंघ पूर्ण सहकार्य करेल. महासचिव भूषण यादव म्हणाले की, विसर्जन मिरवणूकही याच शिस्तीने आणि आनंदी वातावरणात पार पाडण्यासाठी श्री गणेश महासंघ कटिबद्ध आहे. जालना शहराच्या या मंगल परंपरेला सर्वांनी मिळून अधिक समृद्ध करूया, अशी साद त्यांनी घातली.प्रास्ताविकपर भाषणात कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत यांनी जालना शहराची वाढती लोकसंख्या पाहता पोलीस बळ अत्यंत कमी आहे, त्यातच अंतरवाली येथे मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणामुळे जिल्हा पोलीस दलाचा मोठा बंदोबस्त तिकडे होता, अशा परिस्थितीतही पोलीस दलाने गणेशोत्सवाची सुरुवात अत्यंत शांततेत पार पाडली, त्याबद्दल अभिनंदन केले. यावेळी श्री गणेश महासंघाचे उपाध्यक्ष डॉ. शिवदत्त विजयसेनानी, आनंद बंब, गौरव बोरा, कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत, युवा उद्योजक अर्जुन पित्ती, मार्गदर्शक बाबा नंद, माजी अध्यक्ष रोहित भुरेवाल, कमलेश खरे, दुर्गेश कटोटीवाले, अमोल बांगड, जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत साहनी, महेश वाघमारे, अमरचंद भगत, गौतम श्रीश्रीमाळ, आशिष जैन, शाम सारस्वत, पत्रकार नरेंद्र जोगड यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तात्काळ दुष्काळ...

केवळ ३१.७ मि.मी. पाऊस झाला असून, हे प्रमाण अवघे १९ टक्के आहे, असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना आमदार खोतकर म्हणाले की, आपण मतदारसंघातील विविध गावांना भेटी देऊन शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली आहे. दुष्काळाची तीव्रता अत्यंत गंभीर असून खरीप हंगामातील कापूस, तूर, सोयाबीन, मका आदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके पूर्णपणे वाया गेल्याची परिस्थिती आहे.जालना मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर द्राक्ष व मोसंबीच्या फळबागा असूनपाण्याअभावी या फळबागा जगविणे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान बनले आहे. गेल्या सुमारे ४० दिवसांपासून पावसाचा मोठा खंड पडला असून, या काळात केवळ ६ दिवस रिमझिम स्वरूपाचा पाऊस झाल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे.खरीप पिकांचे पुर्णपणे नुकसान झाले असून आगामी रब्बी हंगामातील पेरण्याही होण्याची शक्यता कमी झाली आहे. त्यामुळे पाणीटंचाई, चारा टंचाई आणि फळबागा जगविणे ही मोठी आव्हाने शेतकऱ्यांसमोर उभी आहेत. या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरघोस मदत द्यावी, अशी मागणी आमदार खोतकर यांनी केली.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांची पीक कर्जवसुली आणि घरगुती वीजबिल वसुली तात्पुरती थांबवावी, विद्यार्थ्यांची फी माफ करावी, शेतसारा माफ करावा, अशी मागणीही आमदार खोतकर यांनी केली. तसेच पाणीटंचाई निवारणासाठी तातडीने उपाययोजना सुरू कराव्यात, पिकांचे सरसकट पंचनामे करावेत, चारा छावण्या सुरू कराव्यात आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तातडीने सोडवावा, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी आमदार खोतकर यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना भावनिक आवाहन करताना म्हटले की, ''मुख्यमंत्री देवाभाऊ आणि उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे भाऊ म्हणून सुमीत्राताई पवार बहीण म्हणून शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहेतच. आपण शेतकऱ्यांचे मामा म्हणून या भयानक दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहून मदत करावी. मामाचा आधार फार मोठा असतो. त्यामुळे शेतकरी वर्ग आपल्या आधाराची वाट पाहत आहे.

### यमुना रेसिडेन्सीमध्ये...

आला होता. आधुनिक माध्यमातून शिवरायांचे विचार आणि सामाजिक संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न यमुना रेसिडेन्सी परिसरात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

करण तळेकर यांच्या या नवीन संकल्पनेचे परिसरातून कौतुक होत आहे. ''शिवरायांचा विचार पुढे नेऊया, स्त्री सन्मानाची संस्कृती जपूया!

### एकनाथ शिंदेंना...

करून देण्यासाठी प्रशासकीय प्रक्रिया पुढे नेण्यात आली. वंशावळ तपासणीसाठी समित्या स्थापन करण्यात आल्या आणि संबंधित अभिलेखांची तपासणी करण्यात आली. तसेच मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाचा मार्गही शिंदे सरकारच्या काळात पुढे नेण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

**१० टक्के आरक्षणाचा उल्लेख**

पोहेकर यांनी २० फेब्रुवारी २०२४ रोजी महाराष्ट्र विधिमंडळाने मंजूर केलेल्या महाराष्ट्र राज्य सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग () आरक्षण कायदा, २०२४ चा उल्लेख केला. या कायद्यात शिक्षण आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांसाठी १० टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत कागदपत्रांमध्येही २०२४ च्या कायद्याचा आणि १० टक्के आरक्षणाच्या तरतुदीचा उल्लेख आहे. मात्र या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला न्यायालयात आव्हान देण्यात आले होते आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या नोंदींमध्ये त्या आव्हानाचा उल्लेख आहे. त्यामुळे ''आरक्षणाचा प्रश्न पूर्णपणे अंतिम झाला'' असा अर्थ न काढता, शिंदे सरकारच्या काळात स्वतंत्र १० टक्के आरक्षणासाठी कायदा करण्यात आला, असेच तथ्यात्मक स्वरूपात सांगणे योग्य ठरते.

**''दोन मार्गांनी आरक्षणाचा प्रश्न पुढे नेला''**

''शिंदे सरकारने मराठा आरक्षणासाठी दोन मार्ग पुढे नेले. एक म्हणजे पात्र मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्राच्या माध्यमातून आरक्षणाचा लाभ मिळवून देण्याची प्रक्रिया आणि दुसरा म्हणजे मराठा समाजासाठी स्वतंत्र १० टक्के आरक्षणाचा कायदेशीर मार्ग,'' असे पोहेकर म्हणाले. मराठा आरक्षणाचा प्रश्न हा केवळ राजकीय श्रेयवादाचा विषय नसून शिक्षण, रोजगार आणि पुढील पिढ्यांच्या भवितव्याशी संबंधित असल्याचे सांगत, अधिकृत निर्णय व उपलब्ध कागदपत्रांच्या आधारेच समाजासमोर माहिती मांडली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली.

अंतरवाली सराटी येथील १४ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या सभेचा संदर्भ देत पोहेकर यांनी ४४१ बाधित शेतकऱ्यांना तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नुकसानभरपाई देण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला.

या सभेमुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या ४४१ शेतकऱ्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून सुमारे लाखो रुपयांची मदत देण्यात आली होती. ''त्या वेळी शिंदे समाजासाठी सकारात्मक भूमिका घेत होते, मग आता त्यांच्या विरोधात एवढी तीव्र भाषा का वापरली जात आहे, हा प्रश्न आहे,'' असा सवाल पोहेकर यांनी उपस्थित केला. मनोज जरांगे पाटील यांच्यावर राजकीय आरोप करताना पोहेकर यांनी त्यांच्या काही वक्तव्यांवरही प्रश्न उपस्थित केले. ''ते बीड जिल्ह्यातील आहे. त्यांनी तेथूनच आपले आंदोलन करावे; जालना जिल्ह्यातील समाजकारण आणि राजकारण ढवळून काढू नये,'' असे ते म्हणाले. तसेच विविध राजकीय नेत्यांविषयी जरांगे पाटील यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत पोहेकर यांनी काही नेत्यांबाबत त्यांच्या वक्तव्यांमध्ये सातत्य नसल्याचा आरोप केला. सुनिल तटकरे, शरद पवार, छगन भुजबळ, पार्थ पवार तसेच काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांच्याबाबत ते वेगवेगळ्या पद्धतीने भूमिका घेत असल्याचा दावा पोहेकर यांनी केला.

दरम्यान, ''सुनिल तटकरे यांच्याकडून कितीची सुपारी घेतली?'' तसेच ''शिंदे साहेबांना बदनाम करण्याची सुपारी घेतली आहे का?'' असे सवालही पोहेकर यांनी उपस्थित केले.

''शिंदे साहेब तळागाळातून आलेले आहेत. तळागाळातील आणि सुज्ञ मराठा समाज शिंदेंच्या पाठीशी आहे,'' असे पोहेकर म्हणाले. मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला विरोध नसल्याचे सांगत, आंदोलनाच्या नावाखाली एकाना शिंदे यांच्यावर वैयक्तिक पातळीवर आक्षेपार्ह भाषा वापरली गेल्यास त्याला विरोध केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. वेळ प्रसंगी जिल्ह्यात आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी पत्रकार परिषदेत दिला.

### दिनकररावजी देशमुख...

देशमुख विद्यालय टेंभुर्णी या स्पर्धेत पंच म्हणून सोमेश माघाडे, ओम उखर्डे, राजू दांडगे, विशाल शेळके आणि अमोल राठोड यांनी पंच म्हणून काम पाहिले.

या भव्य क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी विद्यालयाचे क्रीडाशिक्षक मोहन मुनेमाणिक सर यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारीवृंदाने मोलाचे सहकार्य केले

### लोकसंवादाच्या...

योजना आणि उपक्रमांची माहिती पोहोचविणे हा या 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाचा उद्देश आहे. गणेशोत्सवाचे निमित्ताने आज दि. १९ सप्टेंबर रोजी जालना तालूक्यातील शिवशक्ती गणेश मित्र मंडळ, चंदनझिरा येथे लोकसंवाद-२०२६ उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांच्या माध्यमातून आरोग्य, कृषी आणि महिला बाल विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांनी देण्यात आली. जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी डी. एस. बोराडे यांनी यावेळी आरोग्य विभागातील योजनांची माहिती दिली. तर महिला बाल विकास विभागाचे अंमलबजावणी सहाय्यक अधिकारी बी.बी. राठोड, यांनी दिली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष विठ्ठल निलक यांच्यासह या कार्यक्रमास नागरिकांची उपस्थिती होती.

### खेळामुळे राष्ट्रीय...

सोनुने, प्रा. मस्के व्ही एल, प्रा. शिवाजी वैद्य तालुक्यातील सर्व क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सिद्धार्थ कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच,पंच नंदकिशोर गायके, गौरव शिंदे , सम्यक हिवाळे, बालाजी मोहिते, आकाश छडीदार स्वप्निल वाघ , समाधान सुरुशे, पंच म्हणून यांनी काम पाहिले .या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील प्रसिद्धी प्रमुख प्रा.अनिल वैद्य यांनी केले.

### औषधांचे बिल...

आकारले जाईल, असा सक्त इशाराही आयोगाने दिला आहे. या महत्त्वपूर्ण निकालाचे स्वागत करताना विधीज्ञ ॲड. महेश धन्नावत यांनी आरोग्य व्यवस्थेतील गैरप्रकारांवर अत्यंत परखड भाष्य केले आहे. ॲड. महेश धन्नावत म्हणाले की, रुग्णालयात दाखल प्रत्येक रुग्णाला आणि त्याच्या कुटुंबीयांना प्रत्येक गोळी, इंजेक्शन व वैद्यकीय साहित्याचे सविस्तर, पारदर्शक व स्वतंत्र संगणकीय बिल मिळणे हा त्यांचा मूलभूत ग्राहक अधिकार आहे. आजकाल अनेक नामांकित खासगी व धर्मादाय रुग्णालये अंतर्गत नियम अथवा ठोक खरेदीचे तांत्रिक कारण पुढे करून औषधांचे सुटे बिल देत नाहीत, ज्यामुळे गोरगरीब व मध्यमवर्गीय रुग्णांचे लाखो रुपयांचे विमा दावे फेटाळले जाऊन त्यांना प्रचंड आर्थिक व मानसिक छळ सहन करावा लागतो. रुग्णालयांची ही मनमानी आणि आर्थिक लूट रोखण्यासाठी ग्राहक आयोगाचा हा निकाल अत्यंत दिशादर्शक आणि सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा देणारा ठरला आहे. हा निकाल केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रभर तात्काळ, सक्तीने आणि काटेकोरपणे लागू करण्यात यावा, अशी आग्रही मागणी ॲड. महेश धन्नावत यांनी केली आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यातील प्रत्येक खासगी व शासकीय रुग्णालयासाठी औषधांचे स्वतंत्र बिल देणे बंधनकारक करणारी मार्गदर्शक नियमावली जारी करावी, जेणेकरून कोणत्याही रुग्णाचा वैद्यकीय विमा दावा अडकून पडणार नाही आणि आरोग्य व्यवस्थेत संपूर्ण पारदर्शकता निर्माण होईल, असा ठाम विश्वास ॲड. महेश धन्नावत यांनी व्यक्त केला.


















# आर.पी. रोडवर गणेशोत्सवाची भव्य रंगत

शहरातील आर.पी. रोड परिसरातील विविध गणेश मंडळांनी यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त आकर्षक गणेशमूर्ती, मनोहारी देखावे आणि नेत्रदीपक विद्युत रोषणाईची सजावट केली आहे. कलात्मक सजावट व भक्तिमय वातावरणामुळे परिसरात गणेशोत्सवाची रंगत वाढली असून, भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.

छायाचित्र : दर्पण जैन

# घनसावंगी मतदारसंघात दुष्काळ घोषित करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्या आमदार हिकमत उढाण यांची मागणी

**घनसावंगी - प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील पीक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी कृषिमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत काल दिनांक १९ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन बैठकीस घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हिकमत उढाण यांनी उपस्थित राहून घनसावंगी मतदारसंघातील दुष्काळसदृश परिस्थितीची गंभीरता मांडली.घनसावंगी विधानसभा मतदारसंघात पावसाचा दीर्घकाळ खंड पडल्याने शेती पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक भागांतील सोयाबीन, कापूस, तूर यांसह



विविध पिके पावसाअभावी वाळून गेली असून, पिके करपून काळवंडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जात आहेत. या बैठकीत आमदार हिकमत दादा उढाण यांनी मतदारसंघातील प्रत्यक्ष पीक परिस्थिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह उपस्थित अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आणून देत शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध महत्त्वपूर्ण मागण्या केल्या.त्यामध्ये प्रामुख्याने, घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन दुष्काळ घोषित करावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत देण्यात यावी,राज्यातील कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी जलद गतीने करण्यात यावी,२०२५-२६ मध्ये पीककर्ज घेऊन यंदा थकबाकीदार झालेल्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात यावे, शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज वाटप करण्यासाठी बँकांना स्पष्ट निर्देश देण्यात यावेत, ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर होत असलेले लोडशेडिंग बंद करून शेतकऱ्यांना सुरळीत वीजपुरवठा करण्यात करून पिण्याचे पाणी व जनावरांसाठी पिण्याचे पाणी आरक्षीत करुन योग्यप्रकारचे नियोजन करावे लागणार असून -- योजनेची व्याप्ती वाढवून या योजनेअंतर्गत कामे सुरू करण्यात यावीत, पीकविमा योजनेसंदर्भात चर्चा करून शेतकऱ्यांना पीकविम्याचा लाभ मिळण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी तसेच ऊस या पिकाचाही पीकविमा योजनेत समावेश करण्यात यावाया विविध मुद्द्यांवर आमदार हिकमत उढाण यांनी बैठकीत ठामपणे भूमिका मांडत शेतकऱ्यांच्या अडचणींकडे कृषिमंत्री व प्रशासनाचे लक्ष वेधले. पावसाच्या खंडामुळे झालेल्या पीक नुकसानीची गांभीर्याने दखल घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणे, कर्जाच्या संकटातून बाहेर काढणे आणि शेतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.घनसावंगी मतदारसंघातील शेतकऱ्यांना या नैसर्गिक संकटातून दिलासा मिळावा, त्यांच्या नुकसानीची योग्य दखल घेतली जावी आणि शासनाकडून तातडीने मदत मिळावी, यासाठी आमदार हिकमत उढाण यांनी बैठकीत शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडली.

# शिक्षणासाठी 'सत्य संकल्प'चा मोलाचा हात; शाळांना सुविधा, गरजू विद्यार्थ्यांना आधार



**भोकरदन - प्रतिनिधी**

कोळेगाव येथील सत्य संकल्प युनिव्हर्सल ग्लोबल फाउंडेशन सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे.फाउंडेशनच्या वतीने पिंपळगाव रेणुकाई येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेला विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी पाणी फिल्टर भेट देण्यात आला.याशिवाय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,लोकमान्य नगर तसेच शहीद अब्दुल हमीद उर्दू प्राथमिक शाळेलाही आवश्यकतेनुसार मदत करण्यात येत आहे.शाळांना सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच अनाथ व गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठीही फाउंडेशनकडून मदतीचा हात पुढे केला जात आहे.शैक्षणिक साहित्य, आवश्यक खर्च व इतर गरजांनुसार विद्यार्थ्यांना सहकार्य करून कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी फाउंडेशन प्रयत्नशील असल्याचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सुसर यांनी सांगितले.

# २१सप्टेंबर विश्व शांती दिवस

जगात शांतता प्रस्थापित रहावी या उद्देशाने १९८१ पासुन संयुक्त राष्ट्र महासभेने २१ सप्टेंबर विश्व शांती दिवस साजरा करण्याची घोषणा केली.तेव्हा पासून जगात विश्व शांती दिवस साजरा करण्यात येतो.जगात भारताला शांतीचे ''प्रतीक'' मानल्या जाते.विश्वशांतीची सुरूवात भारतानेच केली आणि पुढेही ''विश्व शांतीची जोत'' भारताकडून अशीच ''प्रज्वलित'' होत राहील हे आपल्याला जी-२० शिखर परिषदेवरून लक्षात आलेच आणि आता नुकतेच दिनांक १२ आणि १३ सप्टेंबर २०२६ ला भारतात नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदे दरम्यान भारताने जगाला पुन्हा शांततेचा संदेश देऊन जगाला शांततेचा मार्ग दाखविल्याचे दिसून आले.आज जगात शांती कशी प्रस्थापीत करता येईल याकडे भारताचे संपूर्ण लक्ष आहे. भारत हा देवी-देवता,ऋषि-मुनी,साधु-संत,ज्ञानी, थोर महात्म्ये, क्रांतिकारक,जहालवादी-मवाळवादी अशा अनेक विचारवंतांच्या प्रयत्नाने बनलेला जगाच्या पाठीवरील एकमेव देश भारत आहे.त्यामुळे जगात शांतता कशी प्रस्थापित करता येईल याचा अभ्यास करण्याकरिता संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे नेहमीच असते.कारण जगाच्या पाठीवर भारताचा उगम शांतता प्रस्थापित करण्यासाठीच झाला असावा.त्यामुळे गंगा,कावेरी, गोदावरी,नर्मदा,यमुना, वैनगंगा,तापी, कृष्णा इत्यादी असंख्य नद्या सुध्दा शांतीचे द्योतक मानले जाते. भारताने नेहमी शांततेचा पुरस्कार केला आहे आणि करीत राहिल.''गौतम बुध्दासारख्या महाज्ञानी'' यांनी भारतात शांतीची जोत प्रज्वलीत केली व संपूर्ण जगभर फीरवीली.''मर्यादा पुरूषोत्तम राम'' यांनी सुध्दा शांततेचा पाठ संपूर्ण जगाला शिकवणीला व इस्लामिक धर्मगुरू ''महम्मद पैगंबर'' यांनी सुध्दा विश्व शांती करीता मोठे अभियान छेडले होते त्याचप्रमाणे ''शिख गुरू गुरूनानक देवजी'' यांनीही शांती प्रस्थापित करण्यासाठी मोलाची कामगिरी केली.पुर्वी आणि आताही विश्वात शांती प्रस्थापित करण्यासाठी भारत अग्रेसर होता आणि आहे.यात तिळमात्र शंका नाही.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले असुन जगातील अनेक देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.यामुळे जगात ''तिसऱ्या महायुद्धाची आहाट''निर्माण केली आहे. जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी भारत संपूर्ण ताकद लावीत आहे तर चीन नेहमीच शांती भंग करण्याच्या तयारीत असतो.परंतु भारताचे काम शांततेने होत नसेल तर भारतही ''उग्ररूप'' धारण करून चीनला पटकनी देवु शकते.मानवाचा जन्म शांतता प्रस्थापित करण्यासाठी व जिवसृष्टीचे संरक्षण करण्यासाठी झाला आहे.परंतु चीन कुत्रे, मांजर, चामगाधड, पाल,साप,जे भेटेल ते खातात त्यामुळे आज चीनची बुध्दी कुत्र्यासारखी झाली आहे.त्यामुळे चीनने जर शांती भंग केली तर ''कुत्ते की मौत मारा जायेगा'' ही बाब चीनने लक्षात ठेवली पाहिजे.कारण वेळ पडल्यास तैवान चीनला सूध्दा भारी पडु शकतो. जगात आतंकवाद दिवसेंदिवस वाढत होता यामुळे जगातील संपूर्ण देशात भीतीचे वातावरण निर्माण होवून शांती भंग होत होती.शेवटी संपूर्ण जगाला शपथ घ्यावी लागली की जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी आतंकवाद्यांचा खात्मा होणे गरजेचे आहे.त्या पध्दतीने प्रत्येक देशांनी आतंकवाद्यांविरूध्द कारवाईला सुरुवात केली.कारण प्रत्येक देश आतंकवाद्यांच्या कारवाईने त्रस्त होते आणि आहे.परंतु संपूर्ण विश्वाला वाटायला लागले की आतंकवाद्यांचा नायनाट केल्याशिवाय जगात शांतता प्रस्थापित होवुच शकत नाही.त्या अनुषंगाने आज प्रत्येक देश शांततेसाठी आतंकवाद्यांचा खात्मा करण्यास दृढ ''संकल्प'' असल्याचे दिसून येते. सध्याच्या परीस्थितीत चिनच्या विस्तारवादी नितीमुळे विश्व शांती भंग होण्याच्या मार्गावर आहे.चीन-तैवान संघर्ष लक्षात घेता चायना सी मध्ये चीनला टक्कर देण्यासाठी अमेरिकेसह नाटो सेना सज्ज झाली आहे त्याचबरोबर जापान व ऑस्ट्रेलियाने सूध्दा कंबर कसली आहे. म्हणजेच सध्याच्या परिस्थितीत जगातील शांती भंग करण्याचे काम चीन करीत आहे.याचे प्रायचीत्य संपूर्ण जगाला भोगावे लागु शकते.जगात शांती प्रस्थापित व्हायची असेल तर चीनला त्याची जागा दाखवावीच लागेल. चीनच्या विस्तारवादी धोरणामुळे संपूर्ण जगात ''अशांतीचे वातावरण''निर्माण झाले आहे.परंतु सध्याच्या परिस्थितीत अमेरिकेने इराण सोबत युद्ध करून संपूर्ण जगाला युध्दाच्या खाईत लोटले आहे. जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की ज्या ठिकाणी अनेक धर्माचे,जातीचे,पंथाचे व अनेक भाषा बोलणारे लोक रहातात. भारताने नेहमीच शांतीचा पुरस्कार केला आहे.परंतु भारताशेजारी गद्दारांची फौज उभी ठाकली आहे. एकीकडे पाकिस्तानचा आतंकवाद, बांग्लादेशचा जातीयवाद, म्यानमारची घुसखोरी, नेपाळमध्ये गृहयुद्ध व चीनची विस्तारवादी नीती यामुळे भारताने सुध्दा जशास तसे उत्तर देण्याचे ठाणले आहे.भारत नेहमी शेजारी राष्ट्रांसोबत शांती प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात असतो.परंतु भारताचा जीवलग मित्र समजल्या जाणाऱ्या नेपाळनेसुध्दा चीनचे पाय चाटण्याचे काम करीत असतो व भारताच्या पाठीत खंजर खुपसण्याचे काम करतो हे आपण मागे पहाले. अशाप्रकारे भारता शेजारचे संपूर्ण राष्ट्रांना चीन आर्थिक मदत करून आपला दबदबा निर्माण करून सैन्य सामुग्री व एअरबेस तयार करण्याच्या तयारीत आहे.आज विश्व शांति टिकवून ठेवण्यासाठी अती लोकसंख्या असलेल्या देशांनी लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.जगाच्या पाठीवर लोकसंख्येच्या बाबतीत चीन नंतर भारताचा नंबर लागतो.परंतु भारताच्या भुभागाचा विचार केला तर जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर असल्याचे दिसून येते.त्यामुळे भारताला शांती प्रस्थापित करण्याकरिता एक पाऊल पुढे टाकून''हम दो हमारा एक''ही मोहीम राबवुन लोकसंख्या नियंत्रणात आणाली पाहिजे. युध्द सामुग्रीच्या चढाओढीमुळे प्रत्येक देश अनेक द्वीधेमध्ये असल्याचे दिसून येते.या द्वीधेपासुन मुक्ती मिळवायची असेल तर प्रत्येक देशांनी अणुचाचण्या,घातक शस्त्रास्त्रे,मिसाईल परीक्षण, अणुब्‍ॉब इत्यादींवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.तेव्हाच विश्वात शांती प्रस्थापित होवु शकते.आज संपूर्ण जगाला ग्यात आहे की विश्वामध्ये शांति प्रस्थापित करायची असेल तर भारताचा सहयोग अती आवश्यक आहे.आज युक्रेन-रशिया व हमास-इजरायल संघर्ष,इराण-इझरायल-अमेरिका संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी व शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत अग्रेसर आहे.विश्वशांतीच्या बाबतीत भारत काय आहे हे विश्वाला ''महात्मा गांधींनी'' दाखवून दिले आणि आज १४५ कोटी भारतीयांच्या छत्रछायेच्या माध्यमातून भारत विश्व शांतीचा मसिहा बनल्याचे दिसून येते.कारण प्रत्येक देशाला शांतीची गरज आहे.जगाच्या पाठीवर भारताने अनेक उतार-चढाव पाहीले आहेत.यातुनच भारत भुमितुन शांतीचा उगम झाल्याचे दिसून येते. भारताची संस्कृतीच शांतता प्रस्थापित करण्यासाठी झाली आहे.त्रेतायुग, व्दापरयुग, सत्ययुग आणि कलयुगात सुध्दा भारतीय संस्कृतीने संपूर्ण जगाला शांततेची शिकवण दिली आहे आणि देत आहे.भारत भुमित महाभारत, रामायण इत्यादी ज्या घटना घडल्या त्या सर्व विश्व शांती करीता होत्या ही बाब संपूर्ण जगाने लक्षात ठेवली पाहिजे.भारतातुन जगात जो ही संदेश जातो तो विश्व शांती करीता असतो.भारताने पाकिस्तानला शांततेसाठी हजारो वेळा समजविले.परंतु त्यांच्या नसानसात व रक्तात क्रूरता स्पष्ट दीसुन आली. त्यामुळेच पाकिस्तानात आतंवाद उफाळलेला आहे व तो स्वतः रक्ताच्या लाथोळ्यात अडकल्याचे दिसून येते. त्यामुळेच पाकिस्तानपासुन इस्लामीक देशांसह इतर देश अलग-थलग पडल्याचे दिसून येते.विश्व शांती म्हणजे मानसिक सुख नसुन वन्यप्राणी,जीव-जंतु,जंगल संपदा, निसर्गाचे संतुलन,पृथ्वीचे संरक्षण या संपूर्ण बाबींवर योग्य नियंत्रण ठेवुन त्यांची जोपासना केली तर विश्वामध्ये आपोआप शांती नांदायला सुरूवात होईल. ''विश्व हेची माझे घर''ही भुमिका जगातील प्रत्येक देशांनी व व्यक्तीने जोपासली पाहिजे.आज संपूर्ण जग प्रदुषणामुळे,अनेक आजारामुळे,युध्दजन्य परीस्थितीमुळे जगातील प्रत्येक व्यक्ती त्रस्त आहे.याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे.विश्वामध्ये शांती प्रस्थापित करण्यामागे भारताचा ''सर्वधर्मसमभाव'' हा मुलमंत्र सार्थक ठरत आहे.कारण भारतात हिंदू, मुस्लिम, शिख,ईसाई, बौद्ध, फारसी,ख्रिश्चन इत्यादी अनेक धर्माचा व देवी-देवतांचा वास नेहमी नांदत असतो.त्यामुळे विश्व शांतीच्या गंगेचा उगम भारतातुन झाल्याचे दिसून येते.या लेखाच्या माध्यमातून मी हेच सांगु इच्छितो की २१ सप्टेंबरला जगातील प्रत्येक व्यक्तीने शांतता प्रस्थापिकरण्यासाठी ''संकल्प'' करावा.जगातील देशांना मी आग्रह करेल की ''विस्तारवादी''नीतीचा नायनाट करून जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे.कारण विस्तारवादी नीती संपूर्ण जगाला ''घातक'' आहे.जगात भारताला विश्वशांतीचे उगमस्थान, दुत, आधारस्तंभ अशा अनेक उपमा दिल्या आहेत.याची जाणीव चीनने सुध्दा ठेवली पाहिजे.करोना काळापासून संपूर्ण जग ''नमस्कार'' करायला लागले आहे हे सुद्धा भारतीय संस्कृतीचे शांतीचे ''प्रतीक'' आहे.सध्याच्या परिस्थितीत गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेले युक्रेन-रशिया युद्ध,हमास-इजरायल युद्ध आणि चीन-तैवानचा वाढता संघर्ष टोकाला पोहोचले आहे याला शांत करण्यासाठी भारत अग्रेसर आहे हे भारताने जगाला दाखवून दिले आहे. जगाला यशाकडे वाटचाल करायची असेल तर ''शांतीचा मार्ग''अवलंबावाच लागेल मग तो कोणताही देश असो.२१ सप्टेंबर ''विश्व शांती''दिवस लक्षात घेता जगातील प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी वृक्षारोपण करून शांतीचा संदेश संपूर्ण जगाला दिला पाहिजे.जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.**

# जालना जिल्हा कराटे निवड चाचणी स्पर्धेत खेळाडूंची दमदार कामगिरी

## काता व कुमितेत खेळाडूंची पदकांची लयलूट; सुवर्णपदक विजेत्यांची ४७व्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र कराटे असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या ४७व्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी जालना जिल्हा निवड चाचणी स्पर्धा उत्साहात पार पडली. रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी श्री म.स्था. जैन प्राथमिक विद्यालयाच्या मैदानावर, जालना येथे ही निवड चाचणी घेण्यात आली. या स्पर्धेत जिल्ह्यातील कराटेपटूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत काता आणि कुमिते प्रकारात उल्लेखनीय कामगिरी केली. ४७वी राज्यस्तरीय कराटे स्पर्धा अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, अंधेरी, मुंबई येथे होणार असून, जालना जिल्हा निवड चाचणीत सुवर्णपदक पटकावलेल्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी पुसाराम आसाराम मुंदडा होते. प्रमुख पाहुणे म्हणून गणेश नारायण चिप्पा आणि नवीनकुमार कुशय्या वलकट्टी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना पदके व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

**काता प्रकारात सुवर्णपदकांची कमाई**

काता प्रकारात स्वरा आंबिलवादे, शौर्या पांगरकर, रित्विका ऐशाल, निवांशी वलकट्टी, ध्रुवी मुथा, तन्वी खरटमल, आरुषी वलकट्टी, लावण्या गुडला, अश्विनी आजगे, देवर्ष मुथा, कृष्णा अंबिलवादे, शौर्य मुंदडा, अद्वय खरटमल, ऋषिकेश श्रीराम, मोहन झुंजुर, ओंकार गुट्टे आणि शेलमॉन गुडेकर यांनी सुवर्णपदक पटकावले. काता प्रकारात सृष्टी वैष्णव, श्रावणी संदुपटला, आदश्री पातुरकर, स्नेहा काळुंके, दुर्गा कनिसे, अनुष्का म्हेत्रे, वैष्णवी लोखंडे, पूर्वा माने, आदित्य काळुंके, कुशल वलकट्टी, अनन्य पांगरकर, यशवर्धन चिल्का, आदेश कनिसे आणि नयन गोमतीवाले यांनी रौप्यपदक मिळवले. तर स्वरा मुंदडा, पलक कनिसे, तृप्ती उपरे, आकांक्षा चिल्का, दिव्यता कोठारी, युग कामतीकर, प्रिन्स काळुंके, सुशांत कनिसे,



मल्हार पातुरकर आणि समर्थ डहाळे यांनी कांस्यपदकाची कमाई केली.

**कुमितेतही दमदार कामगिरी**

कुमिते प्रकारातही जालना जिल्ह्यातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. स्नेहा काळुंके, निवांशी वलकट्टी, तन्वी खरटमल, वैष्णवी लोखंडे, आरुषी वलकट्टी, तृप्ती उपरे, आकांक्षा चिल्का, लावण्या गुडला, पूर्वा माने, अश्विनी आजगे, कुशल वलकट्टी, ऋषिकेश श्रीराम, प्रिन्स काळुंके, मोहन झुंजुर, यशवर्धन चिल्का, ओंकार गुट्टे आणि शेलमॉन गुडेकर यांनी सुवर्णपदक पटकावले.

स्वरा मुंदडा, अनुष्का म्हेत्रे, आकाशी खडेकर, दिव्यता कोठारी, अद्वय खरटमल, समर्थ डहाळे, मल्हार पातुरकर आणि नयन गोमतीवाले यांनी रौप्यपदक मिळवले. तर देवेंद्र चिंचपुरे आणि ईशांत रीडलॉन यांनी कांस्यपदक पटकावले.

**सुवर्णपदक विजेत्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड**

जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत सुवर्णपदक मिळविणाऱ्या खेळाडूंची ४७व्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

त्यामुळे जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या खेळाडूंकडून आगामी राज्यस्तरीय स्पर्धेतही चांगल्या कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे. या खेळाडूंना सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा आणि सेन्साई अमन रुपेन्द्र पारचा यांचे मार्गदर्शन लाभले. नियमित सराव, शिस्त, तंत्रशुद्ध प्रशिक्षण आणि स्पर्धेची तयारी यामुळे खेळाडूंना जिल्हास्तरीय निवड चाचणीत आपले कौशल्य सिद्ध करता आले.

**पंच म्हणूनही विद्यार्थ्यांचा सहभाग**

स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सेन्साई रुपेन्द्र पारचा, सेन्साई अमन पारचा यांच्यासह अश्विनी आजगे, पूर्वा माने, लावण्या गुडला, दिव्यता कोठारी, वैष्णवी लोखंडे, ओंकार गुट्टे आणि शेलमॉन गुडेकर यांनी पंच म्हणून जबाबदारी सांभाळली.

खेळाडूंच्या या कामगिरीबद्दल जालना महानगरपालिकेचे उपमहापौर राजेश राऊत, नगरसेवक महावीर ढक्का, नगरसेवक विक्रांत ढक्का, दैनिक युवा आदर्शचे संपादक दीपक शेळके, संजय भगत, श्री म.स्था. जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक वांगोता सर, श्री म.स्था. जैन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पोरवाल मॅडम, सचिन खर्डेकर, यादव बाबू सर, रितेश जयस्वाल, गणेश श्रीराम तसेच पालकवर्गाने विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. जालना जिल्ह्यात कराटे या क्रीडा प्रकाराला मिळणारा वाढता प्रतिसाद आणि खेळाडूंची सातत्यपूर्ण कामगिरी यामुळे जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात नव्या प्रतिभांना व्यासपीठ मिळत असल्याचे यानिमित्ताने दिसून आले.

# जे ई एस महाविद्यालयात हिंदी दिन साजरा ..



**जालना - प्रतिनिधी**

जे ई एस महाविद्यालयात राजभाषा हिंदी दिनानिमित्त प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी भारतीय ज्ञान परंपरा व हिंदी यावर भाष्य केले.विभागप्रमुख डॉ.नानासाहेब गोरे यांनी हिंदी भाषेतील करिअरच्या संधी यावर माहिती दिली.डॉ.प्रवीण चंदनशिवे यांनी प्रवासी भारतीयांचे साहित्य यावर व्याख्यान दिले.यावेळी उपप्राचार्य एस बी बिक्कड,ग्रंथपाल डॉ.मनीषा सुतार,रजिस्ट्रार बाबाजी सोळुंके,डॉ.मानसी लोखंडे,प्रा.महेंद्र बागुल,पर्यवेक्षक एफ एम मोहिते,प्रा.किशोर खरात,प्रा.सुजाता रगडे,सचिन निसर्गन उपस्थित होते.हिंदी सप्ताह निमित्त विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

# प्रामाणिकपणाचा आदर्श! नगरसोलनरसापूर रेल्वेत सापडलेले पाकीट शिक्षकाने केले परत

**परतूर - प्रतिनिधी**

आजच्या काळात हरवलेली वस्तू मिळाल्यानंतर ती स्वतःकडे ठेवण्याच्या घटना घडत असताना, श्रीष्टी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक डिघोळे सर यांनी आपल्या कृतीतून प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला आहे.

नगरसोलनरसापूर रेल्वे परभणी प्रवासादरम्यान डिघोळे सरांना एक पाकीट सापडले. या पाकिटामध्ये रोख रक्कम१००० रु तसेच संबंधित व्यक्तींची महत्त्वाची मूळ कागदपत्रे (ओरिजनल डॉक्युमेंट्स)



असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. पाकिटात सुमारे एक हजार रुपये रोख रक्कम होती. पाकीट सापडल्यानंतर त्यांनी त्यातील रक्कम किंवा कागदपत्रे स्वतःकडे न ठेवता ते योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने तातडीने पुढाकार घेतला. परभणी रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्मवरील टीटीई () यांच्याकडे त्यांनी ते पाकीट प्रामाणिकपणे सुपूर्द केले. टी. टी ने प्रवाशाचा शोध घेत त्या प्रवाशाला ते पॉकेट परत केले ते पॉकेट नांदेड येथील देबडे यांचे असल्याचे कागदपत्रावरून समजले. रोख रकमेपेक्षा महत्त्वाची असलेली मूळ कागदपत्रे हरवल्यास संबंधित व्यक्तीला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे डिघोळे सरांनी दाखविलेला हा प्रामाणिकपणा निश्चितच कौतुकास्पद असल्याची भावना व्यक्त होत आहे.

त्यांच्या या कृतीची माहिती मिळताच श्रीष्टी तांडा येथे जिल्हा परिषद शाळेमध्ये कार्यरत असणारे शिक्षक डिगोळे सर यांचे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच नागरिकांकडून डिघोळे सरांचे कौतुक केले जात आहे. शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकातील धडे शिकवणारा नसून, आपल्या आचरणातून विद्यार्थ्यांसमोर मूल्यांचा आदर्श ठेवणारा मार्गदर्शक असतो, हे दिघोळे सरांच्या कृतीतून अधोरेखित झाले आहे.

# लोकसंवादाच्या माध्यमातून शासकीय योजनांची जनजागृती




**जालना - प्रतिनिधी**

राज्य शासनामार्फत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या अंतर्गतच महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्यावतीने राज्यभर 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद साधत शासकीय *(पान २ वर)*

# दिनकररावजी देशमुख यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त टेंभुर्णीत भव्य आंतरशालेय कबड्डी स्पर्धाचे आयोजन

**दत्ता देशमुख**

दिनकररावजी मारोतराव देशमुख यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त कै. मारोतराव देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टेंभुर्णी येथे शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी भव्य आंतरशालेय कबड्डी स्पर्धेचे आयोजन विद्यालयाच्या क्रीडांगणावर करण्यात आले.

या स्पर्धेत श्रीमती जे.बी.के. विद्यालय, टेंभुर्णी, सेठ ई.बी.के. विद्यालय, टेंभुर्णी, जिजामाता विद्यालय, निमखेडा, जाणता राजा श्री छत्रपती विद्यालय, अकोलादेव, छगनरावजी



भुजबळ विद्यालय, आसई, स्व. भास्कररावजी शिंगणे विद्यालय, पापळ तसेच लुंबिनी विद्यालय, कुंभारझरी इत्यादी शाळेच्या संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव माननीय प्रा. डॉ. श्री. नंदकुमार माळशिखरे सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनजागृती शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष माननीय श्री.भगवान काका देशमुख होते. तसेच सचिव श्री. संदीप दिनकरराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी विविध सहभागी शाळांचे शिक्षक व क्रीडा शिक्षकही उपस्थित होते. श्रीमती जे.बी.के. विद्यालयाचे क्रीडाशिक्षक राजेश शेवाळे सर, जिजामाता विद्यालयाचे सुधीर भोपळे सर, सेठ ई.बी.के. विद्यालयाचे देशमुख सर, छगनरावजी भुजबळ विद्यालयाचे अनिल गाढवे सर तसेच विनोद देवरे यांची उपस्थिती होती. स्पर्धेतील १४ वयोगटातील विजेता संघ कै मारोतराव देशमुख विद्यालय टेंभुर्णी उपविजेता जे.बी.के विद्यालय टेंभुर्णी व संघ १७ वयोगटामध्ये विजेता संघ म्हणून जे.बी.के विद्यालय टेंभुर्णी व उपविजेता संघ जाणता राजा श्री छत्रपती शिवाजी विद्यालय अकोला देव व तृतीय विजेता म्हणून कै. मारोतराव *(पान २ वर)*

# खेळामुळे राष्ट्रीय एकात्मता जोपासली जाते उपप्राचार्य प्रो.डॉ. सुनील मेढे

**दत्ता देशमुख**

क्रीडा व युवक सेवा संचालनाने महाराष्ट्र राज्य पुणे १ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना यांच्या आदेशान्वये सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद तालुकास्तरीय १४, १७, १९ वर्ष आतील मुले - मुली हॉलीबॉल या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते . या क्रीडा स्पर्धेचे अध्यक्ष व उद्घाटक महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो.डॉ. सुनील मेढे यांच्या हस्ते करण्यात आले खेळाडूंना मार्गदर्शन करते वळी ते म्हणाले खेळाडूंनी प्रामाणिकपणाने खेळावे खेळ



हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रभावी माध्यम आहे. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये बंधुभाव व सहकार्याची भावना जोपासली जाते असे मत प्रतिपादन केले .या स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात

प्रमुख उपस्थितीमध्ये तालुका संयोजक श्री एकनाथजी सुरवसे, पोलिस कॉन्स्टेबल अनिल जोशी, मस्के साहेब , क्रीडा प्रा. उदय वझरकर ,प्रा .अनिल वैद्य ,प्राध्यापक वाहेद पटेल, न्यू हायस्कूल चे मुख्याध्यापक श्री रमेश मुरकुटे ,प्रा शैली प्रकाश वाघमारे , प्राध्यापक संजय साळवे डॉ सुनंदा *(पान २ वर)*

# औषधांचे बिल न देणाऱ्या रुग्णालयाला ग्राहक आयोगाचा मोठा दणका

**जालना – प्रतिनिधी**

रुग्णांना उपचारादरम्यान दिलेल्या औषधांचे पक्के व स्वतंत्र बिल न देणे ही वैद्यकीय सेवेतील अत्यंत गंभीर त्रुटी आणि बेकायदेशीर अनुचित व्यापारी प्रथा असल्याचा ऐतिहासिक निकाल एर्नाकुलम जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने दिला आहे. तक्रारदार ओ. विनोद कुमार यांनी समेरिटन हार्ट इन्स्टिट्यूट विरुद्ध ग्राहक संरक्षण कायदा अंतर्गत दाखल केलेल्या ग्राहक तक्रार क्रमांक ३८/२०१९ मध्ये हा महत्वपूर्ण आदेश पारित करण्यात आला. कामाच्या ठिकाणी अचानक छातीत तीव्र वेदना सुरू झाल्याने तक्रारदारास तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी त्यांना ४३ हजार ९०० रुपये किमतीचे इलाक्सिम ४० मिलीग्रॅम नावाचे जीवनरक्षक इंजेक्शन देण्यात आले होते. तक्रारदाराकडे कर्मचारी राज्य विमा योजनेची सुविधा उपलब्ध असल्याने, औषधोपचाराचा सर्व खर्च विमा योजनेतून परत मिळवण्यासाठी त्यांनी रुग्णालयाकडे त्या विशिष्ट औषधाच्या अधिकृत बिलाची वारंवार मागणी केली. मात्र, रुग्णालयाने आम्ही औषधांची मोठ्या प्रमाणावर ठोक खरेदी करतो आणि त्यामुळे रुग्णांना वैयक्तिक स्वरूपात स्वतंत्र बिल देता येत नाही, असा अजब आणि बेजबाबदार पवित्रा घेत औषधाचे पक्के बिल देण्यास स्पष्ट नकार दिला. रुग्णालयाने बिल न दिल्यामुळे संबंधित विमा विभागाकडून तक्रारदाराचा हक्काचा वैद्यकीय दावा फेटाळण्यात आला आणि परिणामी त्यांचे ४३ हजार ९०० रुपयांचे थेट आर्थिक नुकसान झाले. या प्रकरणाची सखोल सुनावणी घेतल्यानंतर आयोगाचे अध्यक्ष डी. बी. बिनू, सदस्य व्ही. रामचंद्रन आणि सदस्य श्रीविद्या टी. एन. यांच्या पूर्ण पीठाने रुग्णालयाचा ठोक खरेदीचा युक्तिवाद पूर्णपणे हास्यास्पद ठरवून फेटाळून लावला. रुग्णाने घेतलेल्या प्रत्येक उपचाराचे व औषधाचे स्वतंत्र बिल मिळणे हा त्याचा कायदेशीर अधिकार असून, विमा संरक्षणाचा लाभ घेण्यासाठी असे बिल असणे अपरिहार्य असते आणि ते न देणे ही रुग्णालयाची अक्षम्य चूक आहे, असे ताशेरे आयोगाने ओढले. आयोगाने रुग्णालयाला तक्रारदाराचे बुडालेले ४३ हजार ९०० रुपये पूर्ण परत करण्याचे आदेश दिले, तसेच रुग्णाला झालेल्या मानसिक त्रासापोटी ५ हजार रुपये नुकसानभरपाई आणि तक्रार खर्चापोटी ५ हजार रुपये असे एकूण ५३ हजार ९०० रुपये आदेशाच्या प्रतीपासून ४५ दिवसांच्या आत देण्याचा कडक दंड ठोठावला. विहित मुदतीत ही रक्कम न दिल्यास या रकमेवर वार्षिक ९ टक्के दराने दंडनीय व्याज *(पान २ वर)*

# खामगावात बचत गटातील महिलांसाठी आरोग्य शिबिर; मोफत तपासणी, औषध वाटप व देशी बियाण्यांचे वितरण

**फुलंब्री - प्रतिनिधी**

फुलंब्री तालुक्यातील खामगाव येथे महिला व बाल विकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या आम्रपाली लोकसंचालित साधन केंद्र, फुलंब्री आणि आयुष्यमान आरोग्य मंदिर, खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने बचत गटातील महिलांसाठी आरोग्य सेवा संकल्प अभियानांतर्गत आरोग्य शिबिर उत्साहात पार पडले.

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित या शिबिरात महिलांची हिमोग्लोबिन (), वजन, रक्तदाब (), रक्तातील साखर व



हृदयगतीची मोफत तपासणी करण्यात आली. तसेच आवश्यक औषधांचे मोफत वितरण करण्यात आले. महिलांसाठी योगासन सत्र घेण्यात आले आणि परसबागेसाठी १६ प्रकारच्या देशी बियाण्यांचेही मोफत वाटप करण्यात आले.

कार्यक्रमात प्रास्ताविक करताना व्यवस्थापक संदीप नांदवे यांनी खामगावमध्ये सात महिला बचत गट कार्यरत असून आतापर्यंत सुमारे ७० लाख रुपयांचे बँक कर्ज वाटप झाल्याची माहिती दिली. तसेच गाव विकास समितीमार्फत २२ अतिगरीब महिलांना प्रत्येकी १५ हजार रुपयांप्रमाणे एकूण ३.३० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली असून, काही महिलांनी मेस व्यवसाय व शेळीपालनासारखे छोटे उद्योग सुरू केल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विधवा महिलांना पोर्टेबल स्टॉल उपलब्ध करून देण्यात आल्याचीही माहिती त्यांनी दिली.समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. साजिद शेख यांनी महिलांना आरोग्याची नियमित काळजी घेण्याचे आवाहन केले. ज्या महिलांचे हिमोग्लोबिन कमी आहे, त्यांनी दोन महिन्यांनी पुन्हा तपासणी करून घ्यावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

यावेळी अध्यक्ष रुख्मनबाई सोनवणे, व्यवस्थापक संदीप नांदवे, सहयोगिनी सुनिता कोलते, शकुंतला सोनवणे, कावेरी गोरे, आशा वर्कर, सीआरपी वंदना पवार तसेच बचत गटातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.